# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.05.2026** **वारः बुधवार**

---

1. पदवीपुर्व वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट युजी परीक्षा रद्द, पेपरफुटी प्रकरणी आतापर्यंत 15 जणांना अटक
2. तामिळनाडूमध्ये, TVK आणि घटक पक्षांची आज विधानसभेत बहुमत चाचणी
3. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप चीनच्या दौऱ्यावर आणि
4. राजस्थानमध्ये उन्हाचा प्रकोप, पारा 48 अंशांवर

**नीट परीक्षा**

गेल्या 3 मे रोजी झालेली पदवीपुर्व वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट युजी परीक्षा रद्द केल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं काल जाहीर केलं. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर परीक्षेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं संस्थेनं सांगितलं. केंद्र सरकारनं या प्रकरणाचा तपास केंद्रिय अण्वेषण विभागाकडे सोपवला आहे. ही परीक्षा पुन्हा होणार असून त्याचं वेळापत्रक लवकरच अधिकृत माध्यमांतून जाहीर केलं जाईल. पुन्हा होणाऱ्या परीक्षेसाठी नव्यानं अर्ज भरण्याची किंवा अतिरिक्त परीक्षा शुल्क भरण्याची गरज नाही. असंही परिषदेनं स्पष्ट केलं आहे.

या प्रकरणात, राजस्थान पोलिसांच्या विशेष तपास पथकानं आतापर्यंत 15 जणांना ताब्यात घेतलं आहे. या संशयित रॅकेटचा विस्तार आणि परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिकांची झालेली देवाणघेवाण तसंच संबंधित आर्थिक व्यवहारांच्या दिशेने तपास सुरु आहे. या पथकाने काल जयपूरमधून मनीष नावाच्या एका कथित सूत्रधाराला ताब्यात घेतलं. तत्पूर्वी, राजस्थान पोलिसांनी 7 मे रोजी डेहराडूनमधून पाच जणांना अटक केली होती. दरम्यान, केंद्रीय अन्वेषण विभागाने महाराष्ट्रातील नाशिक इथून शुभम खैरनारला ताब्यात घेतलं आहे. राजस्थान पोलिसांच्या विनंतीनुसार नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेनं ही कारवाई केली.

**तामिळनाडू**

तामिळनाडूमध्ये, TVK आणि घटक पक्षांच्या वतीनं आज विधानसभेत बहुमत सिद्ध कराण्यासाठी विश्वासदर्शक ठराव मांडला जाईल. मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय हे आपल्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या पक्षांच्या नेत्यांसोबत बैठका घेत आहेत. मित्रपक्षांच्या पाठिंब्यासोबतच, विजय यांनी AIADMK च्या एका गटाचा आणि 'अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम'चे एकमेव आमदार एस. कामराज यांचाही पाठिंबा मिळवला आहे. यामुळे आता विधानसभेत TVK कडे एकंदर 150 आमदारांचा पाठिंबा उपलब्ध आहे.

दरम्यान, काल तामिळनाडूच्या राजकीय घडामोडींमध्ये नवनिर्वाचित सरकारला पाठिंबा देण्याच्या मुद्द्यावरून AIADMK या पक्षात दोन गट पडले. पक्षाचे सरचिटणीस के. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखालील गटाने पक्षाच्या आमदारांना TVK सरकारला पाठिंबा न देण्याचे निर्देश दिले आहेत. पक्षाआदेश न मानणाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी केली जाईल, असा इशारा ज्येष्ठ नेते ए कृष्णमूर्ती यांनी दिला. दुसरीकडे, 30 आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा करणाऱ्या दुसऱ्या गटाने एस. पी. वेलुमणी यांची AIADMK विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड केली आहे. माजी मंत्री सी. व्ही. षण्मुगम यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर, या गटाच्या नेत्यांनी काल प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी आपला गट TVK सरकारला पाठिंबा देईल, अशी घोषणा षण्मुगम यांनी केली.

**आसाम मुख्यमंत्री**

भाजपाचे वरीष्ठ नेते हिमंता बिस्वा सर्मा यांनी काल आसामच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी सरमा यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आसामचे मुख्यमंत्री म्हणून हिमंता बिस्वा सर्मा यांचा हा सलग

दुसरा कार्यकाळ असेल. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांचे नेते, भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री म्हणून 'ऑल इंडिया एनआर काँग्रेस'चे नेते एन. रंगासामी यांचा आज शपथविधी होणार आहे. पुद्दुचेरीचे नायब राज्यपाल के. कैलासनाथन त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. 76 वर्षीय ज्येष्ठ राजकारणी एन. रंगासामी यांचा मुख्यमंत्री म्हणून हा पाचवा कार्यकाळ असेल. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे निवडणूक प्रभारी मनसुख मांडविया, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आदी मान्यवर उपस्थित राहतील.

**<u>परराष्ट्र मंत्री</u>**

'ब्रिक्स' देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक उद्यापासून नवी दिल्ली इथं होणार आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर असतील. 'ब्रिक्स' सदस्य देशांचे परराष्ट्र मंत्री परस्पर हिताच्या जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा करतील अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांना दिली.

**<u>संसदीय मंडळ भूतान</u>**

भारत आणि भूतान संबंध अधिक बळकट करण्याचा उद्देशाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली 51 सदस्यांचं उच्चस्तरीय संसदीय शिष्टमंडळ आज भूतानच्या दौऱ्यावर जात आहेत. संसदेच्या दोन्ही सदनातील खासदार तसंच परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. भारत-भूतान संबंधांच्या विविध पैलूंवर तसंच उभय देशांतील सहकार्य वृद्धिंगत करण्याविषयी यावेळी चर्चा अपेक्षित आहे. हे शिष्टमंडळ भूतानचे राजे आणि पंतप्रधानांचीही भेट घेतील.

**<u>चीन-अमेरिका</u>**

चीन आणि अमेरिका यांच्या दरम्यान व्यापारवृध्दी होण्याच्या दृष्टीनं चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे चीनच्या राजधानीत आज दाखल होणार आहेत. त्यांचा तीन दिवसांचा दौरा अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक मानला जात आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात होणाऱ्या या बहुप्रतिक्षित बैठकीत द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. 2017 नंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी चीनला दिलेला हा पहिलाच दौरा ठरेल. हा दौरा पुढील अनेक दशकांसाठी दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यास मदत करेल. असं चीनला रवाना होण्यापूर्वी ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितलं. ट्रम्प यांच्यासोबत परराष्ट्र सचिव मार्को रुबियो, पीट हेगसेथ, जेम्स ब्लेअर, आदी उपस्थित आहेत.

**<u>इराण-अमेरिका</u>**

इराण-इस्त्रायल-अमेरिका यांच्यादरम्यान युध्दबंदीसाठी नवा शांतता प्रस्ताव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळल्यानंतर अमेरिका आणि इराण यांच्यातील शस्त्रसंधीचा प्रस्तावाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.
दरम्यान, आपला प्रस्ताव वाजवी असल्याचं सांगत कोणत्याही आक्रमणाला प्रत्युत्तर देण्यासाठी इराणचं सैन्यदल सज्ज आहे. असा इशारा इराणचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी दिला आहे.

**<u>अमित-शहा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखालील केंद्र सरकार सायबर-सुरक्षित भारत घडवण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. तथापि, सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यात 'म्युल अकाउंट्स' हे एक मोठे आव्हान असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या 'सायबर गुन्ह्यांसंदर्भातील सहकार्य केंद्राच्या वतीने 'रिझर्व्ह बँक इनोव्हेशन हब' सोबत सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी करण्यात आली. यासंदर्भात शहा यांनी समाजमाध्यमावर माहिती दिली. सामान्य नागरिकांच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे बँक खात्यासंदर्भातील माहिती चोरुन म्युल अकौंट उघडले जाते आणि सायबर चोरट्याचे आर्थिक व्यवहार या खात्यांच्या माध्यमातून केले जातात.

**<u>सोने</u>**

केंद्र सरकारने सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरील आयात शुल्कात वाढ केली असून, ही वाढ आजपासून लागू होईल. अशी माहिती अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात दिली आहे. सोने आणि चांदीच्या घटकांवर 5 टक्के शुल्क आकारले जाईल, तर प्लॅटिनमच्या काही घटकांसाठी 5 पुर्णांक 4 टक्के शुल्क लागू होईल.

**<u>पश्चिम-बंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये सत्तापरिवर्तन झाल्यानंतर, राज्याच्या राजकीय हिंसाचाराच्या जुन्या प्रकरणांबाबत कठोर भूमिका घेतली असून या संदर्भात, तातडीने हाती घ्यावयाच्या विविध उपाययोजनांबाबत निर्देश दिले आहेत. 'कायदा आणि सुव्यवस्था' विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांनी काल सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि रेल्वे पोलीस अधिकाऱ्यांना 2021 च्या विधानसभा निवडणुकांनंतर घडलेल्या हिंसाचाराशी संबंधित सर्व प्रकरणांचा नव्याने आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**<u>न्यायधीश</u>**

देशभरातील न्यायालयांच्या आधुनिकीकरणाचा आराखडा तयार करण्यासाठी
भारताचे सरन्यायाधीश, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सरकारकडून 40 ते 50 हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद सुनिश्चित करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. ही 'न्यायिक पायाभूत सुविधा सल्लागार समिती' सरकारच्या भरीव आर्थिक मदतीच्या माध्यमातून न्यायालयांमधील पायाभूत सुविधांविषयक त्रुटी दूर करण्याचे काम करेल.

**<u>राजस्थान-तापमान</u>**

राजस्थानमध्ये पारा 45 अशांच्या पुढे गेला असून आजही उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. काल दिवसभरांत अनेक ठिकाणी 45 ते 47 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. बारमेरमध्ये काल पारा 48 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअसवर गेला होता. पुढील तीन चार दिवस राज्यातल्या पश्चिम जिल्ह्यांमध्ये तीव्र उष्णता जाणवेल. असा इशारा जयपूरच्या हवामान विभागाच्या संचालकांनी आकाशवाणीशी बोलताना दिला.

उद्यापर्यंत गुजरात, महाराष्ट्र आणि पश्चिम मध्य प्रदेशातही उष्णतेच्या लाट राहण्याची शक्यता आहे. देशाच्या ईशान्य भागांत आणि अंदमान-निकोबार बेटांवर मात्र आज जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मेघगर्जनेसह गारपीट होण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार